झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/झोपुआ/१०३५/२०२४
दिनांक :२०/०८/२०२४

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

## (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

(३) ज्याअर्थी, नगर भुमापन अधिकारी क्र.१ यांनी मो.र.नं.७१४३/२०२२ दि.०८/०२/२०२३ नुसार सदर क्षेत्राची मोजणी केली आहे; आणि

(४) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद सि.स.नं.८०१ ते ८८१ (स.नं.१), मुंढवा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर मालमत्ता पत्रकानुसार ९२१८.२० चौ.मी व मोजणी नकाशावर वास्तुविशारद यांनी प्रमाणित केलेनुसार त्रिमितीय पध्दतीने परिगणीत होणारे क्षेत्र ७८९२.९३ चौ.मी या क्षेत्रापैकी कमीत कमी असलेले क्षेत्र अंदाजे क्षेत्रफळ ७८९२.९३ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) हे क्षेत्र विचारात घेणेत येत आहे; आणि

(५) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, पुरवणी पृष्ठ ३३१४ दिनांक ०८ डिसेंबर १९८३ रोजी प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार गलिच्छ वस्ती म्हणून घोषित केले आहे; आणि

(६) ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र मार्च २१-२७, २०२४ पान क्र.४८-४९ वर तसेच दै.केसरी, दै.लोकमंथन या वृत्तपत्रात दि.१५/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजना क्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर दि.१५/०३/२०२४ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

(७) ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था तसेच सदर क्षेत्राबाबत इतर संबंधितांना प्रत्यक्ष सुनावणी देण्यात आली असुन कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे सादर झाले नाहीत; आणि

(८) ज्याअर्थी, उपरोक्त खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारीत करणारा आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव** :- सि.स.नं.८०१ ते ८८१ (स.नं.१), मुंढवा, पुणे
**महानगरपालिका क्षेत्र** :- पुणे महानगरपालिका.

| गाव - मुंढवा, पुणे | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. | जमीनीमधील भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/ संस्थेचे नाव | पुर्वसूचने मध्ये नमुद क्षेत्र ( चौ. मी.) | वाढ / घट | अंतिम अधिसूचित क्षेत्र (चौ.मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | | | |
| | | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| सि.स.नं.८०१ ते ८८१ (स.नं.१) | सरकारी जमीन | ७८९२.९३ चौ.मी. | - | ७८९२.९३ चौ.मी. | लागु रस्ता | लागु रस्ता | लागु रस्ता | लागु स.नं.२ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- २० / ०६ /२०२४

20.6.24

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत -
१. मा.जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा, पुणे-०१ यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
३. विकसक मे.तारा एस.आर.ए., फ्लॅट नं.ए-२०१, विमान प्लॅटिनम, विमाननगर, पुणे -४११०१४ यांना माहितीस्तव.